आशाताईंचं जाणं म्हणजे भारताच्या रेनेसॉंस युगाचा शेवटचा घटक आपल्यातून गेला >> पान 2

गारे पालमा कोळसा खाण प्रकल्प राज्याच्या ऊर्जा सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 3

लोणी गवळी येथे आमदारांची शाळेला धडक भेट; महिलांच्या तक्रारीनंतर मुख्याधिकाऱ्यांशी चर्चा >> पान 4



दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 244 ■ सोमवार, दि. 13 एप्रिल 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


**सुविचार**

कष्टाचा आवाज कुणाला ऐकू येत नाही,
पण चमक मात्र सगळ्यांच्या डोळ्यांत खटकते.



जना नायकन चित्रपटाच्या ऑनलाइन लीकबद्दल पूजा हेगडेनं व्यक्त केली तीव्र चिंता...

आतील पान

# जेष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** प्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले यांचे मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांना काल (शनिवार ११ एप्रिल २०२६) हृदयविकाराचा झटका आल्यामुळे ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आशा भोसलेंची नात झानई भोसले हिने इन्स्टा पोस्ट करून आजी ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत असल्याचे सांगितले होते.

आशा भोसले मागील सात दशकांपासून पार्श्वगायन करत होत्या. त्यांनी मराठी, हिंदीसह अनेक भाषांतील चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले. चुनरिया या १९४८ मध्ये आलेल्या चित्रपटापासून आशा भोसले यांच्या पार्श्वगायनाच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. त्यांनी वीसपेक्षा जास्त भाषांमध्ये १६ हजारांपेक्षा जास्त गाणी गायली. मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तमिळ, मल्याळम, इंग्रजी आणि रशियनसह एकूण २० भाषांमध्ये आशा भोसले यांनी पार्श्वगायन केले.

चतुरस्त्र गायिका आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी झाला. लता मंगेशकर त्यांची मोठी बहीण. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्या सुमधुर आवाजाने कोट्यवधी रसिकांना वेड लावले. आशा भोसलेंनी दोन हजारांपेक्षा जास्त चित्रपटांतून गाणी गायली. अनेक अल्बमसाठीही त्यांनी गाणी गायली. आशा भोसलेंना २००८ मध्ये पद्मविभूषण या पुरस्काराने गौरविण्यात आले. इतर अनेक पुरस्कारांनीही त्यांना गौरविण्यात आले होते.

रोमँटिक, गझल, पॉप, आयटम साँग अशा सगळ्या प्रकारची गाणी त्यांनी गायली. आशा भोसलेंची आरडी बर्मन यांच्यासोबतची जोडी खूप गाजली. पिया तू अब तो आजा, दम मारो दम, चुरा लिया है तुमने ही त्यांची प्रसिद्ध गाणी आहेत.

आशा भोसले यांनी अनेक फिल्मफेअर आणि राष्ट्रीय पुरस्कार जिंकले आहेत. त्यांना पद्मविभूषण आणि पद्मभूषण या दोन्ही पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.

आशा भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी सांगितल्यानुसार अशा भोसले यांच्या राहत्या घरी म्हणजेच लोअर परेल येथील कासा ग्रांडेमध्ये उद्या (सोमवार १३ एप्रिल) सकाळी ११ वाजल्यापासून लोक त्यांचे अंतिम दर्शन घेऊ शकतील आणि दुपारी ४ वाजता शिवाजी पार्कमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

## पंतप्रधान मोदींनी वाहिली खास मराठीतून आदरांजली



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** स्वरस्वामिनी आशा भोसले यांना पंतप्रधान मोदींनी वाहिली खास मराठीतून आदरांजली वाहिली आहे. भारतातील सर्वात ख्यातनाम आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसले जी यांच्या निधनाने अतिशय दुःख झाले. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीत प्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांच्या मनाला स्पर्श केला. भावपूर्ण गीतांपासून ते जोशपूर्ण संगीत रचनांपर्यंत, त्यांच्या आवाजात कालातीत तेज होते. त्यांच्याशी झालेल्या संवादांच्या आठवणी मी सदैव जपून ठेवेन.त्यांच्या कुटुंबीयांना, चाहत्यांना आणि संगीतप्रेमींना माझ्या भावपूर्ण संवेदना. त्या पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहतील आणि त्यांची गाणी सदैव लोकांच्या आयुष्यात गुंजत राहतील.पंतप्रधान मोदींसह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी देखील अशा भोसले यांनी श्रद्धांजली वाहिली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी आशाताईंना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

### बारमाही ऋतू हिरवा; भावभावनांचा सुरेल महासागर

**मुंबई :** तीन वर्षांपूर्वी धडाक्यात नव्वदी साजरी करणाया आशाताईंच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांच्या निधनाने मंगेशकर घराण्यातील लतादिदींनंतर आणखी एक तारा निखळला आहे. सुरांची सुंदर बाग आज उजाड झाली, अशी शोकमग्न भावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ गायिका, पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण आशा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

### गुगल पे कडून 'पॉकेट मनी' फीचर लॉन्च

**मुंबई :** गुगल पे ने 'पॉकेट मनी' नावाचे एक नवीन फीचर लॉन्च केले आहे. 'पॉकेट मनी' हे फीचर भारतीय राष्ट्रीय पेमेंट्स महामंडळ (एनपीसीआय) द्वारे विकसित करण्यात आलेल्या 'यूपीआय सर्कल' या सुरक्षित तंत्रज्ञानावर आधारित आहे. हे फीचर पूर्णपणे अधिकृत असून भारतीय डिजिटल पेमेंट्स प्रणालीच्या सर्व नियमांचे पालन करून तयार करण्यात आले आहे. त्यामुळे यामध्ये कोणत्याही प्रकारचा सायबर धोका नसून उलट व्यवहार अधिक सुरक्षित करण्यासाठीच हे फीचर तयार करण्यात आले आहे.

### क्वार्टरमध्ये आढळला २२ वर्षीय नर्सचा मृतदेह

**नाशिक :** नाशिक शहरातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. येथील एका प्रसिद्ध खासगी रुग्णालयात सेवा देणाऱ्या २२ वर्षीय तरुण परिचारिकेनं (नर्स) रुग्णालयाच्या स्टाफ रुममध्ये गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. शनिवारी दुपारी ही घटना उघडकीस आली असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### बहुआयामी गायिका काळाच्या पडद्याआड

**मुंबई :** भारतीय संगीतसृष्टीतील अजरामर आणि बहुआयामी गायिका आशा भोसले यांच्या निधनाची बातमी दुःखद आहे. त्यांच्या निधनामुळे भारतीय संगीतविश्वातील तारा निखळला असून एका संगीतमय सुवर्णयुगाचा अंत झाल्याची भावना वन मंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केली आहे. आपल्या शोक संदेशात वनमंत्री श्री. नाईक म्हणाले की, ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत हजारो गाणी गाऊन रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. हिंदीसह मराठी, बंगाली, गुजराती आणि इतर अनेक भाषांमध्ये त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

## ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना हर्षवर्धन सपकाळ यांची श्रद्धांजली

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** भारतीय संगीत क्षेत्रातील दिग्गज आणि ज्येष्ठ गायिका यांच्या निधनाने संगीतविश्वावर शोककळा पसरली असून त्यांच्या जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. या दुःखद प्रसंगी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष यांनी आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

सपकाळ म्हणाले, ''आशाताईंनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत भारतीय संगीताची मोठी सेवा केली आहे. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गायकीमुळे त्यांनी रसिकांच्या मनावर अनेक दशके अधिराज्य गाजवले. संगीत क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले स्थान अढळ आहे.''

ते पुढे म्हणाले, ''अत्यंत संघर्षमय



जीवनातून त्यांनी यश संपादन केले. प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत मंगेशकर कुटुंबाचा वारसा त्यांनी समर्थपणे पुढे नेला. त्यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी आहे. त्यांच्या जाण्याने संपूर्ण देशाला मोठा धक्का बसला आहे.'' ''संगीत क्षेत्रातील एक महान व्यक्तिमत्व आपण गमावले आहे. आशाताईंनी दिलेले योगदान पिढ्यानपिढ्या स्मरणात राहील,'' अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

राजकीय प्रतिक्रिया :

यावेळी यांनी महाविकास आघाडीबाबतही भूमिका मांडली. सर्व घटक पक्ष एकत्रितपणे काम करत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मतदारसंघाच्या विकासासाठी आपला अनुभव वापरणार असल्याचे सांगत, रखडलेली कामे मार्गी लावणे व स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे हे प्राधान्य राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. सत्ताधारी पक्षाच्या धोरणांमुळे सर्वसामान्य जनता त्रस्त असल्याची टीका त्यांनी केली. तसेच महाविकास आघाडीला जनतेचा मोठा पाठिंबा असून आगामी निवडणुकांमध्ये विजय निश्चित असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## आशाताईंच्या निधनाने संगीत क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी: केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केल्या दुःखद संवेदना

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** आशा भोसले ह्या प्रतिभासंपन्न गायिका होत्या त्यांच्या निधनामुळे संगीत विश्वाची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. अशी दुःखद संवेदना केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली ज्येष्ठ पार्श्वगायिका, पद्मविभूषण व महाराष्ट्र भूषण आशा ताई भोसले यांच्या



निधनाबद्दल केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी दुःख व्यक्त केले आहे.

संगीतातील त्यांच्या व्यापक योगदानामुळे त्यांनी संगीत रसिकांच्या अनेक पिढ्यांवर राज्य केले. आठ दशकांच्या सांगीतिक कारकिर्दीत त्यांनी असंख्य अजरामर गीते सादर करून भारताच्या सांस्कृतिक परंपरेला समृद्ध केले. आशाजींची कलेप्रती बांधिलकी ही भावी पिढ्यांमधील कलाकारांना प्रेरणा देत राहील अशी दुःखद संवेदना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी शोक संवेदना व्यक्त केल्या आहेत.

## आशाताईंच्या निधनाने सचिन तेंडुलकरही गहिवरला: म्हणाला – आमच्यासाठी त्या कुटुंबाचाच भाग होत्या, तुमची खूप आठवण येईल



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** भारतीय संगीताचा सुवर्णकाळ आपल्या आवाजाने अजरामर करणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांच्या निधनाने अवघा देश शोकसागरात बुडाला आहे. या दुःखद प्रसंगी क्रिकेटचा देव मानल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरने अत्यंत भावूक शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. सचिन आणि आशाताईंमधील नाते हे केवळ कलाकार आणि चाहता असे नव्हते, तर ते एका आई आणि मुलासारखे घट्ट होते. आशाताईंच्या जाण्याने तेंडुलकर कुटुंबाने आपला एक मार्गदर्शक आधारस्तंभ गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.

सचिन तेंडुलकरने इन्स्टाग्रामवर एक भावूक पोस्ट शेअर करत आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. आजचा दिवस केवळ भारतासाठीच नाही, तर जगभरातील संगीतप्रेमींसाठी अत्यंत दुःखद आहे. आमच्यासाठी आशा ताई म्हणजे केवळ एक महान गायिका नव्हत्या, तर त्या आमच्या कुटुंबाचाच एक अविभाज्य भाग होत्या. आज जे दुःख होत आहे, ते व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे पडत आहेत. काळ जणू थांबला आहे असं वाटतंय, पण त्यांची अजरामर गाणी त्यांना कायम आमच्यात जिवंत ठेवतील. धन्यवाद ताई, आमचं आयुष्य तुमच्या सुरांनी आणि प्रेमाने समृद्ध केल्याबद्दल. तुमची खूप आठवण येईल, असे तो म्हणाला.

## सुरांची 'सम्राज्ञी' आशा भोसले यांचं निधन; जावेद अख्तर, सायरा बानो, रझा मुराद यांच्यासह दिग्गजांनी वाहिली श्रद्धांजली




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं रविवारी (दि.१२) निधन झालं. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. भारतरत्न आणि गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांची लहान बहीण असलेल्या आशा भोसले यांना हिंदी सिनेसृष्टीची अष्टपैलू गायिका म्हणून ओळखलं जायचं. शनिवारी (११ एप्रिल) त्यांना हृदयविकाराचा झटका आल्यानंतर ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्या निधनानंतर मनोरंजन सृष्टीतील कलाकारांनी प्रतिक्रिया देत आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. चित्रपट क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी ईटीव्ही भारतकडं प्रतिक्रिया देत आशा भोसले यांच्याबरोबरच्या आठवणींना उजाळा दिला.

**आशा भोसले यांच्या आवाजाची रेंज अद्भुत होती :** ''आमच्या कुटुंबाचे आशा भोसले आणि लताजी यांच्याशी घनिष्ठ नातं होतं. पूर्वीच्या काळी ऑर्केस्ट्रा संगीत वाजवत असताना आणि गाण म्हणत असताना मायक्रोफोनच्या सहाय्यानं सर्व रेकॉर्डिंग थेट (लाईव्ह) केलं जायचं. यावेळी आशाजी मला नेहमी आत बोलावून आपल्या हावभावांनी गाणं कसं गायचं? याबद्दल मार्गदर्शन करायच्या. त्यांच्या आजारपणापूर्वी



मला त्यांच्याशी बोलता आलं, यासाठी मी कृतज्ञ आहे. त्यांच्या आवाजाची रेंज अद्भुत होती. आशा भोसले नेहमीच स्नेह आणि आदर दाखवायच्या. त्या आणि लताजी माझ्या आजी, शमशाद बेगम यांचा खूप आदर करत असत. अशी माणसं दुर्मिळ असतात. आम्ही त्यांना नेहमीच स्मरणात ठेवू. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो,'' अशा भावनिक शब्दात ज्येष्ठ अभिनेत्री सायरा बानो यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**आता पंचमजी आणि तुमची पुन्हा भेट होईल :** ''आशा भोसलेजी, तुमच्या आत्म्यास शांती लाभो. तिथं कोणतंही युद्ध नाही, कोणतीही वेदना नाही, फक्त संगीत आणि तुम्ही. आता पंचमजी आणि तुमची पुन्हा भेट होईल. वयाच्या ९२ व्या वर्षी त्या आम्हाला सोडून गेल्या, पण त्यांनी मागं सोडलेला वारसा अतुलनीय आहे. धाडसी, खंबीर आणि अष्टपैलू गायिका म्हणून त्यांची ओळख होती. त्यांची गाणी आपल्यासोबत कायम राहतील. आम्ही सर्वजण त्यांच्यावर खूप प्रेम करतो. त्यांच्या आठवणी अगणित आहेत. आशा भोसले यांचं वर्णन शब्दांत करणं अशक्य आहे. हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबीयांना मिळो,'' अशा शब्दात पार्श्वगायिका उषा उत्थुप यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण केली.

आशा भोसले यांच्यासारखा आवाज कधीच ऐकू आला नाही. मी लहानपणापासून त्यांची गाणी ऐकत आलो आहे. ओ. पी. नय्यर आणि पंचम दा यांच्यासोबतची त्यांची गाणी हे सगळं >> पान ३

## युध्दाची झळ अमेरिकेलाही बसतेय

फेब्रुवारीच्या शेवटाला सुरू झालेला अमेरिका आणि इराण संघर्ष, अल्पावधीतच आधुनिक इतिहासातील सर्वात खर्चिक युद्धांपैकी एक ठरला. यात सहभागे देशांचे भांडवल मोठ्या प्रमाणात खच पडले. मागील काही दशकांतील दहशतवादविरोधी कारवायांपेक्षा हे युद्ध पूर्णपणे वेगळे असून, ते औद्योगिक युद्धाच्या स्वरूपात लढले जात आहे. यामध्ये प्रचंड प्रमाणात झालेल्या दारुगोळ्यांच्या वापराने, उच्च-मूल्य असलेल्या सामरिक साधनांची हानी झाली. परिणामी, जागतिक तसेच अमेरिकेच्या देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम दिसत आहेत. पेंटागॉनने आधीच कमी झालेले शस्त्रसाठे भरून काढण्यासाठी आणि प्रत्यक्ष लढाईचा खर्च भागवण्यासाठी, २०० अब्ज डॉलर्सच्या अतिरिक्त संरक्षण अंदाजपत्रकाची मागणी केली आहे. यामुळे या युद्धाचा वित्तीय प्रवास अभूतपूर्व ठरत आहे. शस्त्रास्त्रे, प्लॅटफॉर्म्स, प्रादेशिक पायाभूत सुविधा आणि व्यापक आर्थिक परिणाम यांमधील खर्चाचा सविस्तर आढावा खाली दिला आहे. या युद्धाच्या अत्यंत प्रचंड खर्चामागील मुख्य कारण म्हणजे, स्वस्त इराणी प्रक्षेपण प्रणाली आणि त्यांना निष्प्रभ करण्यासाठी लागणाऱ्या महागड्या अमेरिकन 'इंटरसेप्टर्स.' ही असममित झीज अमेरिकन खजिन्याला वेगाने रिकामे करणारी ठरत आहे. अमेरिकेच्या नौदल आणि हवाई दलाने इराणच्या एकात्मिक हवाई संरक्षण प्रणालीला निष्क्रिय करण्यासाठी आणि संरक्षणात्मक बंकरमध्ये असलेल्या 'आयआरजीसी' सुविधांवर हल्ले करण्यासाठी हजारो किमती क्रूझ क्षेपणास्त्रे डागली. प्रत्येक टॉमहॉक क्षेपणास्त्राची किंमत सुमारे दोन दशलक्ष डॉलर्स इतकी आहे. आतापर्यंतच्या युद्धात हजारो क्षेपणास्त्रे डागल्यामुळे, त्यांचा खरेदी खर्च एकटाच चार ते सहा अब्ज डॉलर्सच्या पुढे गेला आहे.इंटरसेप्टर्स (एसएम-३ आणि एसएम-६): लाल समुद्र आणि अरबी समुद्रातील कॅरिअर स्ट्राईक ग्रुप्सना इराणी 'बॅलिस्टिक' आणि जहाजविरोधी क्षेपणास्त्रांपासून वाचवण्यासाठी, स्टॅण्डर्ड मिसाईल्सचा वापर करावा लागला आहे. एका एसएम-३ इंटरसेप्टरची किंमत प्रत्येकी १० ते २८ दशलक्ष डॉलर्सदरम्यान असून, उच्च तीव्रतेच्या हल्ल्यांदरम्यान केवळ नौदल हवाई संरक्षणावरच एका आठवड्यात अमेरिकेने, एक अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त खर्च केल्याची नोंद आहे. अमेरिकेच्या अतिशय महागड्या 'एअरक्राफ्ट कॅरिअर स्ट्राईक ग्रुप'चे संरक्षण करण्यासाठी, त्यापेक्षा अजून जास्त महाग क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला आहे. खाडीतील तळांचे संरक्षण करणाऱ्या जमिनीवर आधारित बॅटरींमध्ये, प्रत्येकी चार दशलक्ष डॉलर्स किमतीची 'पॅट्रियट' क्षेपणास्त्रे वापरली जातात, तर 'थाड' इंटरसेप्टरची किंमत प्रत्येकी साधारण १२.६ दशलक्ष डॉलर्स आहे. आखाती देशांतील अमेरिकेचे लष्करी तळाचा वापार अमेरिका व्यवस्थित करूच शकली नाही. उलट, ही लष्करी तळे इराणसाठी अगदी जवळची आणि तयारच असलेली प्रहाराची लक्ष्ये बनली. इराणकडून वापरल्या जाणाऱ्या आत्मघातकी ड्रोन, ज्यांची किंमत २० हजार ते ५० हजार डॉलर्सदरम्यान आहे. मात्र, त्यांना पाडण्यासाठी अमेरिकेला जे इंटरसेप्टर्स वापरावे लागतात, ते ड्रोनच्या किमतीपेक्षा ८० ते १०० पटीने महाग आहेत. हा किंमत-विनिमय गुणोत्तर व्यवहार्य नाही. इराणने याच ड्रोन्सच्या झुंडीचा एकत्र वापर करुन, अमेरिकेच्या महागड्या अॅन्टी-एअरक्राफ्ट संरक्षण प्रणालीला मोठ्या प्रमाणात महागडी शस्त्रे वापरण्याकरता भाग पाडले. या युद्धात व्हिएतनाम युद्धानंतर प्रथमच, अमेरिकेची प्रगत लढाऊ विमाने लढाईत गमावली गेली. याचा अर्थ असाच की, महागडी लढाऊ विमाने आणि तुलनेने स्वस्त अॅन्टी-एअरक्राफ्ट क्षेपणास्त्रे यांच्या या लढाईत, अॅन्टी-एअरक्राफ्ट क्षेपणास्त्रांनीच बाजी मारल्याचे दिसते. १.५ ते दोन अब्ज डॉलर्सच्या थेट विमानफ्रेम नुकसानीव्यतिरिक्त, तैनातीचा खर्चदेखील प्रचंड आहे. एकच 'कॅरिअर स्ट्राईक ग्रुप' चालवण्याचा खर्च दिवसाला अंदाजे सहा ते दहा दशलक्ष डॉलर्स इतका आहे. अरबी समुद्र आणि लाल समुद्रात अनेक 'कॅरिअर स्ट्राईक ग्रुप' सतत तैनात असल्याने, केवळ नौदलाच्या मोहिमेवरच अमेरिकेचा दरमहा एक अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त खर्च होत आहे. दीर्घकाळ तैनात राहिल्यामुळे एअरक्राफ्ट कॅरिअरवरील सैनिक खूपच थकले असून, त्यांचे मनोबलही खच्ची झाले आहे. अशा खच्ची झालेल्या सैनिकांनीच कदाचित एअरक्राफ्ट कॅरिअरला आग लावली असावी. बहारीनमधील अमेरिकन पाचव्या ताफ्याच्या मुख्यालयावर आणि सौदी अरबमधील 'प्रिन्स सुलतान' हवाईतळावर झालेल्या इराणी प्रत्युत्तरात्मक क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे हँगर, इंधन साठे आणि विशेष दुरुस्ती सुविधा यांना शेकडो दशलक्ष डॉलर्सचे नुकसान झाले आहे. या हल्ल्यांमध्ये नुकसानीस गेलेले 'गोल्डन डोम' किंवा 'एजेस अशोरसारख्या विशेष घटकांची पुनर्स्थापना करणे केवळ आर्थिक ओझेच नाही, तर पुरवठा साखळीमधीलही मोठा अडथळा आहे. हे युद्ध आता केवळ मर्यादित लष्करी घटना राहिलेले नाही; ते एक गंभीर देशांतर्गत आर्थिक संकट बनले आहे. अमेरिकेत पेट्रोलच्या किमती जवळपास ३३ टक्क्यांनी वाढल्या असून, सरासरी २.९८ डॉलर्स प्रतिगॅलनवरून काहीच आठवड्यांत जवळपास चार डॉलर्स प्रतिगॅलनपर्यंत पोहोचल्या आहेत. डिझेल आणि जेट इंधनाच्या किमतीही आणखी तीव्र वाढल्या आहेत. यामुळे लॉजिस्टिक्स आणि ग्राहक वस्तूंच्या किमतींमध्ये थेट वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षासाठी मागितलेले अतिरिक्त २०० अब्ज डॉलर्स आणि २०२७ साठी प्रस्तावित १.५ ट्रिलियन डॉलर्सचे संरक्षण अंदाजपत्रक, या दोहोंचा एकत्रित अर्थ भांडवलाच्या प्रचंड पुनर्वाटपाशी संबंधित आहे. हे निधी देशांतर्गत क्षेत्रांतून वळवले जात असल्यामुळे 'मेडिकेड', पायाभूत सुविधा आणि शिक्षण क्षेत्रातील संभाव्य कपातींचा अंदाज व्यक्त केला जात आहे. 'जीडीपी' आणि महागाई : अर्थतज्ज्ञांनी २०२६ साठी अमेरिकेच्या वाढीचा अंदाज ०.५ टक्क्यांनी कमी केला आहे, तर महागाईचा अंदाज ३.२ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. वित्तीय तूट, चालू खाते तूट आणि ऊर्जा तूट अशा त्रिगुणी तुटीत भर पडत आहे. जर संघर्ष सध्या सारखाच अधिक एक महिन्यासाठी चालू राहिला, तर आर्थिक ओझे कमाल पातळीवर वाढेल. मोहिमा आणि दारुगोळ्यावरचा वाढून, आणखी ३० ते ४० अब्ज डॉलर्सचा खर्च होऊ शकतो. काही प्रकारच्या इंटरसेप्टर्सची पातळी धोकादायकरीत्या कमी होण्याची शक्यता असून, त्यांना ते प्रमाण त्वरित, मोठ्या उत्पादनाद्वारे भरून काढावे लागेल. यासाठी अनुदानांच्या स्वरूपात आणखी दहा अब्ज डॉलर्स जाऊ शकतात.

# आशाताईंचं जाणं म्हणजे भारताच्या रेनेसाँस युगाचा शेवटचा घटक आपल्यातून गेला; राज ठाकरेंनी व्यक्त केल्या भावना

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** भारताच्या ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांनी रविवारी (दि.१२) दुपारी मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. आपल्या अजरामर आवाजानं संपूर्ण विश्वाला भुरळ घालणाऱ्या आशा भोसले काळाच्या पडद्याआड गेल्यानं केवळ चित्रपटसृष्टीवर नव्हे तर राजकीय, सामाजिक, क्रीडा, कला आणि साहित्य अशा सर्वच क्षेत्रांवर शोककळा पसरली. आशा भोसले यांच्या निधनानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून आपल्या भावना व्यक्त केल्या.

राज ठाकरे यांची सोशल मीडियावर भावनिक पोस्ट : आशा भोसले यांच्या निधनानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंनी सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट केली आहे. ''आशाताईंचं जाणं म्हणजे भारताच्या रेनेसाँस युगाचा शेवटचा महत्त्वाचा घटक आज आपल्यातून गेला,'' असं राज ठाकरे यांनी म्हटलंय.

आशाताई : दि लास्ट एम्परर

ज्येष्ठ पार्श्वगायिका आशाताई भोसले यांचं निधन झालं. मी माझ्या एक दोन भाषणांमध्ये, आणि पुढं एकदा आशाताईंशी झालेल्या संवादात म्हणलं होतं की, लतादीदी आणि तुम्ही म्हणजे भारतीय चित्रपट संगीतातील, लिओनार्दो द विंची आणि मायकलॅन्जलो आहात. लिओनार्दो द विंचीच्या कामाकडं बघताना त्यातील परफेक्शन, कमालीचा आखीव रेखीवपणा, जबरदस्त ठहराव आणि एक सर्रकन जाणवणारी आध्यात्मिक अनुभूती जाणवत राहते. हे सगळं दीदींच्या गाण्यात जाणवत राहतं. सगळं कसं परफेक्ट, आदर्शवत वाटत राहतं. तर, मायकलॅन्जलोच्या कामात नजाकत आहे, आवेग आहे, लडिवाळपणा आणि बंडखोरी पण आहे. कधी-कधी त्याची शिल्प त्या दगडातून बाहेर येण्यास आतुर आहेत, असं वाटत राहतं. तसंच आशाताईंच्या गाण्यांचं. त्यांच्या गाण्यात ओढ आहे, खेळकरपणा आहे, धिटाई आहे आणि माणूस म्हणल्यावर थोडा बेधडकपणा, झुगारून देण्याची तीव्र इच्छा असणारच, ते सगळं आशाताईंच्या गाण्यात जाणवत राहतं. गाणं हे माझं पॅशन आहे किंवा ऍक्टिंग माझं पॅशन आहे असं म्हणत स्वतःला कलाकार आणि कालांतरानं ज्येष्ठ कलाकार इत्यादी म्हणून घेणारे हल्ली ढिगानं आढळतात. असलं म्हणण्याची मुभा नियतीनं आशाताईंना कधीच दिली नाही. वयाच्या १५व्या वर्षी स्वतःला आणि कुटुंबाला उभं करायचं आहे आणि त्यासाठी काय जमतंय तर निसर्गदत्त आवाजाची देणगी. या इतक्या भांडवलावर त्यांनी गाणं गायला सुरुवात केली. अजाणत्या वयात व्यक्तिगत आयुष्यात आशाताईंनी अफाट त्रास सहन केला. पण या त्रासानं किंवा दुःखानं त्यांच्या मनातला किंतुपरंतुवर मात केली आणि आयुष्यात जी धिटाई आली ती आवाजात आली. मी वर म्हणल्याप्रमाणं लतादीदींचा आवाज म्हणजे परफेक्शन आणि कमालीचा ठहराव. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सगळं वातावरण भारावलेलं असताना असा आवाज हा त्या काळाचा आवाज वाटावा असा आवाज आहे. अशावेळेस स्वतःचा आवाज तयार करायचा, त्यासाठी आपल्या एक्सप्रेशनला साजेसं गाणं मिळेपर्यंत वाट पहायची यासाठी आशाताईंनी काय पेशन्स ठेवले असतील हे त्याच जाणोत.

पिया तू अब तो आजा मध्ये प्रियकराला थेट बेधडक आवाहन आहे. आईये मेहरबान मध्ये लडिवाळपणा आहे,



दिल चीज क्या है आप मेरी जान लिजिए मध्ये नजाकत आहे. दम मारो दम मध्ये बंडखोरी आहे, सगळ्या चौकटी तोडून येण्याची तीव्र उर्मी आहे. याच आशाताई मराठी भावसंगीतात मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश म्हणत युगायुगांचं वैराग्याचे प्रतीक शंकर चराचरात आहेत आणि लक्ष ठेवून आहेत हे आर्तपणे सांगतात. व्यक्तिगत आयुष्याच्या जवळपास प्रत्येक टप्प्यावर त्यांनी वादळं पहिली. तरीही आशाताई खचल्या नाहीत, दुःख हत्यार बनवलं नाही, कडवटपणा येऊ दिला नाही. दुःख हाताळायची त्यांनी कलाच जणू आत्मसात केली होती. म्हणूनच दीदी कायम दैवी वाटत राहिल्या तर आशाताई खूप मानवी वाटत राहिल्या. जसा दीदींचा सहवास मिळाला तसाच आशाताईंचा मिळाला. मी भाग्यवान आहे की ज्यांनी या देशाच्या अनेक दशकांच्या भावविश्वाला आकार दिला त्या दोन्ही बहिणींचा मला ओतप्रोत सहवास मिळाला. माझ्यासाठी आशाताईंकडं फक्त ज्येष्ठ गायिका म्हणून बघणं हे पुरेसं नाही तर तो गाण्यातून घडलेला अलौकिक प्रवास होता. तो चिरकाल तुमच्या माझ्यासोबत राहील, नवनवीन पदर उघडत राहील. मी मागं माझ्या भाषणांत म्हणालो होतो की लता दीदी असतील, आशाताई असतील किंवा त्यांच्यासारखे इतर कलाकार असतील, ते जर नसते आणि त्यांनी आपल्याला त्यांच्या भावविश्वात गुंतवून ठेवलं नसतं तर या देशांत कधीच अराजक आलं असतं! उत्तुंग काय असतं आणि ते कुठं बघायचं याचा मापदंड या लोकांनी आपल्याला घालून दिला! जसं लिओनार्दो द विंची आणि मायकलॅन्जलो हे जरी वरवर परस्पर विरोधी वाटले तरी युरोपातील रेनेसाँस युगाला त्या दोघांनी वेगेवेगळ्या पद्धतीनं आकार दिला. तसा आकार लतादीदी आणि आशाताईंनी भारतीय चित्रपट संगीताच्या रेनेसाँस युगाला दिला. काही वर्षांपूर्वी दीदी गेल्या आणि आज आशाताई गेल्या. भारताच्या रेनेसाँस युगाचा शेवटचा महत्वाचा घटक आज आपल्यातून गेला!

**आशाताईंना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची विनम्र श्रद्धांजली – राज ठाकरे**

**राज ठाकरे आणि आशाताईंचं जिव्हाळ्याचं नातं :** आशाताईंच्या निधनावर अशी भावनिक प्रतिक्रिया राज ठाकरे यांनी आपल्या शब्दांतून व्यक्त केलीय. राज ठाकरे यांच्यासाठी लतादीदी आणि आशाताई नेहमीच भावनिक बंध राहिलाय. त्यामुळंच, आशाताईंच्या निधनानंतर राज ठाकरेंनी आपल्या खास शैलीत आशाताईंचं वर्णन करत त्यांना एक अनोखी श्रद्धांजली वाहिली आहे. आशा भोसले यांनी एका जाहीर कार्यक्रमात राज ठाकरेंची हुबेहूब नक्कल करून राज ठाकरेंसह सर्वांचीच दाद मिळवली होती. जेव्हा राज ठाकरे यांच्यावर हीप बोनची शस्त्रक्रिया झाली होती, तेव्हा आशा भोसले यांनी स्वतः त्यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती. आशा भोसले यांनी राज ठाकरे यांच्या वक्तृत्वशैलीचं आणि राजकीय शैलीचं कौतुक करताना, त्यांची तुलना शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याशी केली होती. मात्र, साल २०१२ मध्ये जेव्हा मनसेनं एका रिॲलिटी शोमध्ये पाकिस्तानी कलाकारांच्या सहभागाला विरोध केला होता, तेव्हा आशाताईंनी त्यावर एका कार्यक्रमात बोलताना ''मला फक्त संगीताची भाषा समजते, राजकारण नाही'' असं आपलं स्पष्ट आणि प्रामाणिक मत मांडलं होतं.

**सोमवारी दुपारी शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार**

रविवारी सायंकाळी आशा भोसले यांचं पार्थिव लोअर परेलमधील त्यांच्या निवासस्थानी नेण्यात आलं. त्यावेळी मुंबई पोलिसांनी एस्कॉर्टमध्ये आशाताईंचा देह ब्रीच कँडीहून त्यांच्या निवासस्थानापर्यंत नेला. आशा भोसले यांच्या छातीत संसर्ग झाल्यामुळं त्यांना शनिवारी सायंकाळी उशिरा ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र, एकापाठोपाठ एक सारे अवयव निकामी झाल्यानं त्यांचं निधन झाल्याचं डॉक्टरांनी जाहिर केलं. उद्या, सोमवारी दुपारी ४ वाजता आशा भोसले यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# ८२ वर्षांची गायन कारकीर्द, 20 भाषांमध्ये १२,000 गाणी: आशा भोसले यांनी ९ फिल्मफेअरसह 100+ पुरस्कार जिंकले

**मुंबई । प्रतिनिधी :** भारतीय संगीत क्षेत्रातील सर्वात अष्टपैलू गायिका आशा भोसले यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले आहे. त्यांनी आपल्या आवाजाने सात दशके चित्रपटसृष्टीवर राज्य केले. वयाच्या १० व्या वर्षी पहिले गाणे गाणाऱ्या आशा यांची गायन कारकीर्द ८२ वर्षांची होती, ज्यात त्यांनी १२ हजारांहून अधिक गाणी गायली.

१९४७ मध्ये एका रेकॉर्डिस्टने आशा भोसले यांचा आवाज खराब असल्याचे सांगून नाकारला होता, पण त्यांनी हार मानली नाही. आशा यांनी संघर्ष सुरू ठेवला आणि हिंदी-मराठीसह २० भाषांमध्ये गाणी गाऊन आपले नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंदवले.

आशा भोसले यांनी ९ फिल्मफेअर पुरस्कार जिंकले आहेत. यात ७ सर्वोत्कृष्ट महिला पार्श्वगायिका पुरस्कारांचा समावेश आहे. एका अहवालानुसार, आशा यांना १०० हून अधिक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले. आशा यांना एकूण १८ वेळा फिल्मफेअर पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते.

नवीन गायिकांना संधी मिळावी यासाठी त्यांनी १९७९ मध्ये या पुरस्कारासाठी नामांकन मिळाल्यावर आपले नाव मागे घेतले होते. आशा यांनी मोहम्मद रफी यांच्यासोबत सुमारे ९०० आणि किशोर कुमार यांच्यासोबत ६०० हून अधिक गाणी गायली आहेत.

सांगलीत जन्म, वडील शास्त्रीय गायक होते

आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी महाराष्ट्रातील सांगली येथे झाला होता. त्या प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित दीनानाथ मंगेशकर यांच्या कन्या होत्या. घरात सुरुवातीपासूनच संगीताचे वातावरण होते. त्यांच्या भावंडांमध्ये लता मंगेशकर, मीना खडीकर, उषा मंगेशकर आणि हृदयनाथ मंगेशकर हे देखील संगीत क्षेत्राशी संबंधित होते.

जेव्हा आशा फक्त ९ वर्षांच्या होत्या, तेव्हा १९४२ मध्ये त्यांचे वडील दीनानाथ मंगेशकर यांचे निधन झाले. यामुळे कुटुंबावर आर्थिक संकट आले. कुटुंबाला आधार देण्यासाठी लता आणि आशा यांनी लहान वयातच गाणे आणि चित्रपटांमध्ये छोट्या भूमिका करणे सुरू केले होते.

मराठी चित्रपटांपासून बॉलिवूडपर्यंतचा प्रवास

आशा भोसले यांनी त्यांच्या गायन कारकिर्दीची सुरुवात १९४३ मध्ये माझं बाळ या मराठी चित्रपटातील चला चला नव बाडा या गाण्याने केली होती. हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांना पहिली संधी १९४८ मध्ये चुनरिया चित्रपटातील सावन आया या गाण्याने मिळाली.

सुरुवातीच्या काळात आशा यांना ती गाणी मिळत होती जी लता मंगेशकर, शमशाद बेगम किंवा गीता दत्त यांसारख्या प्रमुख गायिका सोडून देत असत. त्यावेळी त्यांना अनेकदा चित्रपटांमध्ये खलनायक, नर्तिका किंवा सहायक भूमिकांसाठी गाण्यासाठी बोलावले जात असे.

ओपी. नय्यर यांच्या गाण्यांनी करिअरला नवी उंची दिली

संगीतकार ओपी. नय्यर आणि आशा भोसले यांची जोडी भारतीय संगीत इतिहासातील सर्वात यशस्वी जोड्यांपैकी एक मानली जाते. नय्यर साहेबांनी आशाजींचा अशा काळात हात धरला, जेव्हा त्या स्वतःच्या ओळखीसाठी संघर्ष करत होत्या आणि त्यांना फक्त तीच गाणी मिळत होती जी मोठ्या गायिका नाकारत असत.

नय्यर साहेबांनीच पहिल्यांदा त्यांच्या आवाजातील त्या कंपाउंड खणखणीतपणाला आणि वेस्टर्न मॉड्यूलेशनला ओळखले, ज्याला इतर संगीतकार खराब समजून नाकारत होते. १९५४ मध्ये मंगू चित्रपटापासून सुरू झालेला हा प्रवास १९५७ च्या नया दौर चित्रपटासोबत त्याच्या शिखरावर पोहोचला. या चित्रपटातील उडे जब जब जुल्फें तुम्हारी आणि मांग के साथ तुम्हारा यांसारख्या गाण्यांनी आशाजींना रातोरात सुपरस्टार गायिका बनवले.

पुढील दोन दशके ओपी. नैयर यांनी एक कठोर निर्णय घेत केवळ आशा भोसले यांच्यासोबतच काम केले आणि कधीही लता मंगेशकर यांच्याकडे वळले नाहीत. त्यांनी आशाजींसाठी ३२४ गाणी तयार केली, ज्यामध्ये हावडा ब्रिज मधील आइए मेहरबां आणि कश्मीर की कली मधील रोमँटिक गाण्यांचा समावेश आहे. या गाण्यांमुळेच आशा यांनी मोठी बहीण लता यांच्या छायेतून बाहेर पडून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली.

आरडी बर्मन यांच्यासोबत गायले दम मारो दम

त्यानंतर १९६० आणि ७० च्या दशकात संगीतकार आर.डी. बर्मन (पंचम दा) यांच्यासोबतच्या त्यांच्या जोडीने संगीताची व्याख्याच बदलली. पंचम दा यांनी आशाताईंकडून दम मारो दम (हरे रामा हरे कृष्णा) आणि पिया तू अब तो आजा (कारवाँ) यांसारखी वेस्टर्न आणि जॅझ शैलीतील गाणी गाऊन घेतली, ज्यामुळे आशा क्वीन ऑफ इंडिपॉप बनल्या.

आशा भोसले यांनी वेस्टर्न टच, मॉड्यूलेशन आपल्या आवाजात इतके सुंदर गुंफले होते, जे त्या काळात इतर कोणत्याही गायकाकडे नव्हते. त्यांनी गीता दत्त आणि शमशाद बेगम यांसारख्या गायिकांना त्यांच्याच काळात कडवी टक्कर दिली आणि नंतर अल्का याज्ञिक, कविता कृष्णमूर्ती आणि सुनिधी चौहान यांसारख्या पिढ्यांसाठीही त्या प्रेरणास्थान ठरल्या.

जेव्हा लोकांना वाटले की, त्या फक्त कॅबरे गाणी गाऊ शकतात, तेव्हा १९८१ मध्ये उमराव जान हा चित्रपट आला. संगीतकार खय्याम यांच्या दिग्दर्शनाखाली आशा यांनी दिल चीज क्या है आणि इन आंखों की मस्ती के यांसारख्या उत्कृष्ट गझला गाऊन शास्त्रीय गायनातही लता मंगेशकर यांच्या बरोबरीने आपले स्थान निश्चित केले.

मोहम्मद रफी यांच्यासोबत ९०० हून अधिक गाणी गायली

आशाजींनी रफी साहेबांसोबत सर्वाधिक ९०० युगलगीते गायली आहेत. नया दौर आणि तीसरी मंजिल सारख्या चित्रपटांमधील गाणी आजही कल्ट क्लासिक आहेत.

१९५० पासून सुरू होऊन १९८७ मध्ये किशोर दा यांच्या निधनापर्यंत ही जोडी सुपरहिट राहिली. दोघांनी ६०० हून अधिक गाणी एकत्र गायली.

लता मंगेशकर यांच्यासोबत ८० च्या आसपास अविस्मरणीय गाणी गायली. यामध्ये मन क्यों बहका रे बहका (उत्सव) या गाण्याचा समावेश आहे.

आर.डी. बर्मन (पंचम दा) यांच्यासाठी ५०० हून अधिक गाणी गायली. त्यांनी आशा यांच्या आवाजाला कॅबरे, जॅझ आणि रॉक संगीतासाठी घडवले.

ओ.पी. नय्यर साहेबांनी फक्त आशा यांनाच आपला मुख्य आवाज बनवले. दोघांनी मिळून ३०० हून अधिक गाणी तयार केली.

गायनाशिवाय स्वयंपाक आणि यशस्वी रेस्टॉरंट व्यवसाय

आशा भोसले केवळ एक महान गायिकाच नव्हत्या, तर एक उत्कृष्ट स्वयंपाकी देखील होत्या. त्या नेहमी म्हणायच्या की, जर त्या गायिका नसत्या तर स्वयंपाकी असत्या. त्यांच्या हातचे कढई गोश्त आणि बिर्याणीचे चाहते राज कपूरपासून ते ऋषी कपूरपर्यंत होते.

त्यांनी आपला हाच छंद व्यवसायात बदलला. त्यांनी आशाज () नावाच्या रेस्टॉरंटची एक जागतिक साखळी सुरू केली. त्यांचे पहिले रेस्टॉरंट दुबईमध्ये उघडले, त्यानंतर कुवैत, बर्मिंगहॅम, मँचेस्टर आणि अबू धाबीसारख्या शहरांमध्येही त्याचा विस्तार झाला. त्या त्यांच्या रेस्टॉरंटमधील शेफ्सना स्वतः प्रशिक्षण देत असत.

ब्रिटिश बँडसोबत गायलेलं शेवटचं गाणं

आशा भोसले यांचा आवाज फक्त बॉलिवूडपुरता मर्यादित नव्हता, तर आंतरराष्ट्रीय संगीत जगतातही त्यांना तेवढाच मान होता. मार्च २०२६ मध्ये रिलीज झालेल्या प्रसिद्ध ब्रिटिश व्हर्च्युअल बँड गोरिल्लाजच्या नवव्या अल्बम द माउंटेन (पर्वत) मध्ये त्यांचे गाणे समाविष्ट आहे.

''द शैडोई लाइट'' नावाच्या या ट्रॅककडे आता त्यांच्या शानदार कारकिर्दीतील शेवटचा अध्याय म्हणून पाहिले जात आहे. यात त्यांनी ब्रिटिश कलाकार ग्रफ राइस आणि सरोद उस्ताद अमान-अयान अली बंगश यांच्यासोबत काम केले होते.

या अल्बमच्या पोस्टरमध्ये आशा हिरव्या रंगाच्या साडीत उभ्या दिसतात.

या अल्बमच्या पोस्टरमध्ये आशा हिरव्या रंगाच्या साडीत उभ्या दिसतात.

गोरिल्लाज बँड बनवणारे डेमन अल्बर्न खरं तर ७० च्या दशकातील बॉलिवूड संगीत आणि आरडी बर्मनचे खूप मोठे चाहते आहेत. त्यांनी अनेक मुलाखतींमध्ये आशा भोसले यांच्या आवाजाला सायकेडेलिक आणि एक्सपेरिमेंटल असे वर्णन केले होते. हेच कारण होते की त्यांनी त्यांचा हा नवीन अल्बम भारतात रेकॉर्ड केला. या अल्बममध्ये आशाताईंशिवाय अनुष्का शंकरनेही सोबत काम केले आहे.

आशा त्यांच्या शेवटच्या वर्षांत म्युझिक रिॲलिटी शोमध्ये परीक्षक म्हणून आणि लाईव्ह कॉन्सर्टमध्ये सक्रिय राहिल्या. २०२३ मध्येही त्यांनी त्यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त दुबईत सादरीकरण केले होते. त्यांच्या आवाजातील जो ताजेपणा १९५० मध्ये होता, तोच ९२ वर्षांच्या वयापर्यंत कायम राहिला.

ऑस्ट्रेलियाई क्रिकेटपटू ब्रेट लीसोबतही आशा यांनी गायले आहे

आशा भोसले यांनी २००६ साली ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू आणि वेगवान गोलंदाज ब्रेट ली यांच्यासोबत यू आर द वन फॉर मी ( ) हे खास गाणे गायले होते. खरं तर, ब्रेट ली केवळ एक क्रिकेटपटूच नाहीत तर त्यांना संगीताचीही खूप आवड आहे.

जेव्हा ब्रेट ली भारत दौऱ्यावर होते, तेव्हा त्यांची भेट आशाजींशी झाली. आशाताई ब्रेट ली यांच्या व्यक्तिमत्त्वाने आणि संगीतातील त्यांच्या आवडीने खूप प्रभावित झाल्या आणि त्यांनी ब्रेट ली यांना एकत्र गाणे रेकॉर्ड करण्याचा प्रस्ताव दिला. हे गाणे ब्रेट ली यांनी स्वतः लिहिले होते आणि ते आशा अँड फ्रेंड्स अल्बमचा भाग म्हणून रिलीज करण्यात आले होते.

ही जुगलबंदी यासाठीही खास होती, कारण यात ब्रेट लीने हिंदी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये सूर लावले होते. हे गाणे त्यावेळी भारत आणि ऑस्ट्रेलिया दोन्ही देशांमध्ये चार्टबस्टर ठरले होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# गारे पालमा कोळसा खाण प्रकल्प राज्याच्या ऊर्जा सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर । प्रतिनिधी :** राज्यातील ऊर्जा सुरक्षितेसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या उच्च दर्जाच्या कोळसा खाणीमुळे कोळशाचे अवलंबित्व कमी होणार आहे. तसेच पर्यावरणाच्या संवर्धनासोबत विजेचे दर कमी होऊन भविष्यातील ऊर्जा गरज पूर्ण होणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

महानिर्मितीच्या छत्तीसगड राज्यातील गारे पालमा सेक्टर -२ कोळसा खाणीतून कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात येणाऱ्या पहिल्या कोळसा रेल्वेरॅक चे आगमन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी रेल्वेरॅकला हिरवी झेंडी दाखवून कोळसा हातळणी प्रकल्पाची पहाणी केली. त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

यावेळी राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महानिर्मितीचे अध्यक्ष राघाकृष्णन बी, संचालक अभय हरणे, कार्यकारी संचालक नितीन वाघ, गारे पालमा कोळसा खाणीचे मुख्य अभियंता शैलेश पडोळे, कोराडी औष्णीक प्रकल्पाचे मुख्य अभियंता सुदीप राणे, कार्यकारी संचालक पंकज सपाटे, गिरीश कुमार, मध्य रेल्वेचे विभागीय महाव्यवस्थापक दीपककुमार गुप्ता, विनायक गर्गा, आदी पदधकारी व अधिकारी उपस्थित होते.

गारे पालमा या कोळसा खाणीतून अत्यंत उच्च दर्जाचा कोळसा उपलब्ध होत असल्यामुळे ऊर्जा निर्मितीची क्षमता वाढणार असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की ऊर्जा निर्मितीसाठी असलेले अवलंबित्व त्यामुळे कमी होणार आहे. तसेच पर्यावरणा सोबत विजेचे दर कमी होण्यास मदत होणार आहे. राज्यातील लोडशेडींग राहणार नाही तसेच शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करणे सुलभ होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महानिर्मितीला गारे पालमा ही कोळसा खाण आवंटीत झाली असून १ हजार ५८३.४८७ हेक्टर मध्ये असलेल्या खाणीमुळे पुढील ७७ वर्ष उच्च दर्जाचा कोळसा उपलब्ध होणार आहे. या खाणीत ६५५.१५२ मेट्रिक टन कोळसा उत्पादन होणार आहे. या खाणीत मार्च २६ पासून उत्पादन सुरू झाले असून आतापर्यत ८० हजार ८९५.३१ मेट्रिक टन कोळशाचे उत्पादन झाले असल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



या कोळसा खाणीमधून कोराडी, चंद्रपूर आणि परळी येथे दीर्घकालीन पुरवठा होणार आहे. महाऊर्जाला उपलब्ध झालेल्या या खाणीमुळे कोळशाच्या गुणवत्तेवर नियंत्रण राहणार आहे. हा प्रकल्प राज्याच्या ऊर्जा सुरक्षेला बळकटी देणारा असून भविष्यातील वीज तुटवड्याचा धोका कमी होणार आहे. तसेच दीर्घकालीन शाश्वत विकासासाठी एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे.

प्रारंभी महानिर्मितीचे अध्यक्ष राधाकृष्णन बी यांनी स्वागत करुन या प्रकल्पाबद्दल माहिती दिली. यावेळी लोकप्रतिनिधी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## महत्त्वाचे...

### पद्मविभूषण आशा भोसले यांच्या निधनाने संगीतविश्व शोकाकुल – महिला व बालविकास मंत्री तटकरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** भारतीय संगीत क्षेत्राला जागतिक ओळख मिळवून देणाऱ्या आशाताई भोसले यांच्या जाण्याने संगीतविश्वावर शोककळा पसरली आहे. आज देह रुपाने त्या आपल्यात नसल्या, तरी त्यांच्या सुरेल आवाजाच्या रूपात त्या सदैव अजरामर राहतील, अशा शब्दांत महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्या आपल्या संदेशात म्हणतात, आपल्या सुमधुर आवाजाने लाखो रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या आशाताईंनी मराठी, हिंदी, गुजरातीसह अनेक भाषांमध्ये गाणी गाऊन संगीताची अविरत सेवा केली. त्यांच्या कारकिर्दीत त्यांना पद्मविभूषण, ग्रॅमी, दादासाहेब फाळके पुरस्कार, महाराष्ट्र भूषण यांसारख्या मानाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. त्यांच्या निधनाने देशभरातून हळहळ व्यक्त होत आहे. आशाताई भोसले यांच्या निधनामुळे भारतीय संगीत क्षेत्राने एक अमूल्य रत्न गमावले असून, त्यांच्या आठवणी आणि गाणी पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतील.

### आशाताईंच्या जाण्याने भारतीय संगीताचा अमूल्य ठेवा हरपला – कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** पद्मविभूषण सन्मानाने गौरविण्यात आलेल्या ज्येष्ठ व सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय संगीतसृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे, असे मला मनापासून वाटते. या शब्दात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी भावपूर्ण श्रद्धांजली व्यक्त केली आहे. त्यांनी आपल्या सुरेल, बहुआयामी आणि वैशिष्ट्यपूर्ण आवाजाने अनेक दशकं संगीत क्षेत्रावर अधिराज्य गाजवलं. हिंदी, मराठीसह विविध भारतीय भाषांमध्ये हजारो गाणी गाऊन त्यांनी संगीतप्रेमींच्या मनावर अढळ स्थान निर्माण केले. प्रत्येक गाण्यातून त्यांनी अनोखा ठसा उमटवला. आशाताई भोसले या केवळ गायिका नव्हत्या, तर त्या भारतीय संगीत परंपरेचा एक जिवंत वारसा होत्या. त्यांच्या गायकीतील विविधता, ऊर्जा आणि भावस्पर्शी सादरीकरण हे येणाऱ्या पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील. अशा महान कलाकार पुन्हा होणे कठीण आहे. त्यांच्या निधनामुळे संगीतविश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचा अमर आवाज आणि त्यांनी दिलेल्या असंख्य कलाकृती युगानुयुगे रसिकांच्या स्मरणात राहतील, याबाबत मला पूर्ण विश्वास आहे. त्यांच्या आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत, या दुःखद प्रसंगी मी त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच प्रार्थना.! या शब्दात कृषिमंत्री यांनी भावपूर्ण श्रध्दांजली व्यक्त केली आहे.

### जगण्यातील श्रीमंती गमावली ! – सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार

**मुंबई । प्रतिनिधी :** भोगल्या दुःखाचे आनंदी गाणे गाण्याची ताकद असलेल्याष्ठ जय शारदे.. वागेश्वरी ची प्रार्थना गाणाऱ्याष्ठ कॅब्रे, लावणी, भक्ती गीत, ओवी आणि अभंगासह भावगीत, चित्रपटगीतही विलक्षण ताकदीने गाणाऱ्याष्ठ भाषेची बंधने तोडून २० पेक्षा जास्त भाषेत गाणाऱ्याष्ठ स्वतःच्या आयुष्यात आलेल्या प्रत्येक संकटाला लिलया हरवणाऱ्याष्ठ आणि भाऊबीजेला ''सोनियांच्या ताटी उजळल्या ज्योतीष्ठ'' अशी अजरामर ओवाळणी गाणाऱ्या आशाताई गेल्या.

माझ्यासाठी तर माझी प्रिय बहिण मी आज गमावलीष्ठ साक्षात सरस्वतीच्या वीणेची झंकार आज शांत झाली.मला भाऊ म्हणून उदंड प्रेम त्यांनी दिले. मी काय गमावले हे शब्दात सांगता येणार नाहीष्ठमझ्या जगण्यातील श्रीमंती गमावलीष्ठ एवढे नक्की. त्यांच्या असंख्य भेटी माझ्या हृदयात साठवलेल्या आहेत, अशा शब्दात सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

### ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाने गायन संगीत सृष्टीचे न भरुन येणारे नुकसान – मदत व पुनर्वसन मंत्री

**मुंबई । प्रतिनिधी :** पद्मविभूषण सन्मानाने गौरविण्यात आलेल्या ज्येष्ठ व सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या निधनामुळे भारतीय संगीताचा एक सुवर्णकाळ संपला आहे. त्यांच्या निधनाने भारतीय गायन व संगीतसृष्टीचे कधीही न भरून निघणारे मोठे नुकसान झाले आहे, या शब्दांत मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी आपली भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. आशाजींनी आपल्या सुरेल, बहुआयामी आणि वैशिष्ट्यपूर्ण आवाजाने अनेक दशकं संगीत क्षेत्रावर अधिराज्य गाजवलं. हिंदी आणि मराठीसह विविध भारतीय भाषांमध्ये हजारो गाणी गाऊन त्यांनी जगभरातील संगीतप्रेमींच्या मनावर एक अढळ स्थान निर्माण केले होते. आशा भोसले यांच्या जाण्याने संपूर्ण कलाविश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. या दुःखद प्रसंगी मी त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच प्रार्थना.! या शब्दात मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी भावपूर्ण श्रद्धांजली व्यक्त केली आहे.

## सिमकार्ड हॅक करुन झालेली लूट हा खातेधारकाचा बेजबाबदारपणा नाही: बँकेला इतक्या लाखांचा परतावा देण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश



**मुंबई । प्रतिनिधी :** मोबाईलचं सिमकार्ड हॅक करुन झालेल्या ऑनलाईन फ्रॉडला बळी पडलेल्या एका खातेदाराला मुंबई उच्च न्यायालयानं मोठा दिलासा दिला आहे. या खातेदाराचे भामट्यांनी लुटलेले तब्बल ३८ लाख रुपये त्याला परत करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं एचडीएफसी बँकेला दिले आहेत. बँकेचा दोष नाही, मात्र खातेधारक बेजबाबदार होता, हे सिद्ध झालेलं नाही, असं मुंबई उच्च न्यायालयाचं महत्त्वपूर्ण निरीक्षण यावेळी दिसून आलं.

काय आहे प्रकरण : पुणे येथील रहिवासी सुबोध कोरडे यांची साल २०२१ ऑनलाईन फसवणूक झाली होती. सायबर गुन्हेगारांनी त्यांचा मोबाईल सिमकार्ड हॅक करत त्यांना अलगदपणे आपल्या जाळ्यात ओढलं. सिमकार्ड हॅक करत त्यांच्या ऑनलाईन बँकिंग व्यवहारात काही लाभार्थी जोडले गेले. पैसे वितरित करण्याची त्यांची मर्यादा ४ लाखांवरुन थेट ४० लाख केली गेली. ही प्रक्रिया पूर्ण करताच त्यांच्या खात्यातून ३८ लाख ४ हजार रूपये काही सेकंदात वळते केले गेले. ही बाब लक्षात येताच कोरडे यांनी तातडीनं बँकेत व पोलिसांत याची रितसर तक्रार केली. बँकेनं यातनं आपली जबाबदारी झटकताच सुबोध कोरडे यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे दार ठोठावत बँकेकडून झालेल्या आर्थिक नुकसानाबाबत परताव्याची मागणी केली.

मुंबई उच्च न्यायालयानं काय दिला निकाल : सुबोध कोरडे यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. बँक खात्यात होत असलेल्या प्रत्येक अपडेटची माहिती आम्ही कोरडे यांना एसएमएसद्वारे आपण नियमितपणे देत होतो. मात्र या लुटीसाठी बँकेला दोषी धरता येणार नाही, असा दावा बँकेच्यावतीनं मुंबई उच्च न्यायालयात केला गेला. मात्र सुबोध कोरडे यांचं सिमकार्ड हे हॅक करण्यात आलं होतं. त्यामुळे त्यांना बँकेचा कोणताही मेसेज मिळाला नाही. याउलट फसवणूक झाल्याचं कळताच त्यांनी याची रितसर तक्रार दाखल केली होती. झालेल्या या आर्थिक फसवणुकीसाठी त्यांना दोषी धरता येणार नाही, असं नमूद करत मुंबई उच्च न्यायालयानं याचिकाकर्त्यांचा दावा मान्य करत त्यांना मोठा दिलासा दिला.

## जना नायकन चित्रपटाच्या ऑनलाइन लीकबद्दल पूजा हेगडेनं व्यक्त केली तीव्र चिंता...

**हैदराबाद/वृत्तसंस्था :** तमिळ सुपरस्टार थलपथीच्या आगामी जना नायगन या चित्रपटाच्या लीकमुळं संपूर्ण चित्रपटसृष्टी संतप्त झाली आहे. या प्रकरणामुळं अनेक कलाकारांनी तीव्र प्रतिक्रिया दिल्या आहेत. आता चित्रपटाची मुख्य अभिनेत्री, पूजा हेगडे हिनेही आपली नाराजी व्यक्त केली आहे. शनिवारी, ११ एप्रिल रोजी, अभिनेत्रीनं तिच्या ट्विटर हँडलवर जना नायगन लीकबद्दल एक निवेदन शेअर केले, ज्यात तिनं आपली निराशा व्यक्त केली आणि या प्रोजेक्टमागील कठोर परिश्रम आणि समर्पणावर प्रकाश टाकला. तिनं या घटनेला अत्यंत निराशाजनक म्हटलंय. पूजा हेगडेनं तिच्या निवेदनात लिहिलं, माझ्या प्रिय प्रेक्षकांनो, एक चित्रपट हा असंख्य तासांची मेहनत, सर्जनशील जोखीम, वैयक्तिक त्याग आणि तुम्हाला सर्वोत्तम अनुभव देण्यासाठी दररोज झटणाऱ्या टीमचा परिणाम असतो. आमचा चित्रपट ऑनलाइन लीक झालेला पाहून मलाच नाही, तर त्यावर काम केलेल्या प्रत्येकाला याबद्दल खूप दुःख होत आहे.

चित्रपट लीक झाल्याबद्दल बोलताना, पुजानं लिहिलं, हा चित्रपट बेकायदेशीरपणे लीक आणि शेअर होताना पाहणे खूप कठीण आहे. आकडेवारीमुळं नाही, तर यामुळं चित्रपटातील प्रत्येक कलाकार आणि तंत्रज्ञाला मिळायला हवा असलेला आदर मिळत नाही. विजयचा शेवटचा चित्रपट थिएटरमध्ये पाहण्याचे आवाहन करत पूजा म्हणाली, विजय सरांचा शेवटचा चित्रपट, शेवटच्या वेळी, मोठ्या पडद्यावर व्यवस्थितपणे पाहण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र यायलाच हवं, नाही का? चला तर मग तो व्यवस्थित पाहूया. वाट पाहूया. ती योग्य वेळी येईल. पायरसीला प्रोत्साहन देऊ नका. अशा प्रकारेच सिनेमा आणि कला टिकून राहतील.

पूजा हेगडेच्या आधी, चिरंजीवी, रजनीकांत, कमल हासन, विजय देवराकोंडा, सूर्या शिवकुमार, प्रदीप रंगनाथन, कीर्ती, शिवकार्तिकेयन, विजय अँटनी, सिबी सत्यराज, शंतनू विशाल, केविन, जीवा, आणि खुशबू सुंदर यांच्यासह अनेक दक्षिण भारतीय चित्रपट कलाकारांनी जना नायगन लीकवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. या स्टार्सनं पायरसीचा निषेध केला आहे आणि प्रेक्षकांना चित्रपटाला थिएटरमध्ये जाऊन पाठिंबा देण्याचे आवाहन केलं आहे. हा चित्रपट जून २०२६च्या महिन्यात रिलीज होण्याची शक्यता आहे. सध्या या चित्रपटाच्या रिलीजची तारीख ही समोर आली नाही. मात्र विजयचे चाहते त्याच्या या आगमी चित्रपटाच्या रिलीजीची वाट पाहात आहेत.

## उग्रवाद्यांच्या भीषण हल्ल्यात बीएसएफ जवान शहीद, ५ जिल्ह्यांत इंटरनेट बंद

**उखरुल/वृत्तसंस्था :** मणिपूरच्या उखरुल जिल्ह्यात शुक्रवारी (१० एप्रिल) उग्रवाद्यांच्या हल्ल्यात सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) एका जवानाला हौतात्म्य आले. मिथुन मंडल असे या हुतात्मा जवानाचे नाव असून ते मोंगकोट चेपु परिसरात गस्त घालत असताना दुपारी ४:३० वाजेच्या सुमाराला त्यांना गोळी लागली. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने इम्फालच्या रिम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान सायंकाळी ६ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. मिथून मंडल पश्चिम बंगालमधील भगजन टोला गावचे रहिवासी होते.

मुख्यमंत्री यमनाम खेमचंद सिंह यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. त्यांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, ''कॉन्स्टेबल मिथुन मंडल यांचे बलिदान अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या शौर्याचा सन्मान राखला जाईल आणि त्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही. राज्य सरकार पीडित कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभी आहे.'' अशी ग्वाही त्यांनी दिली.

फेब्रुवारी महिन्यापासून जातीय हिंसाचाराचा सामना करणाऱ्या या भागात अद्याप तणाव कायम आहे. उग्रवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दलांकडून सतत शोधमोहीम राबवली जात आहे. दरम्यान, कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेऊन राज्य सरकारने ५ जिल्ह्यांमध्ये मोबाईल इंटरनेट सेवांवरील बंदी आणखी २ दिवसांसाठी वाढवली आहे. ही बंदी इंफाळ पश्चिम, इंफाळ पूर्व, थौबल, ककचिंग आणि बिष्णुपूर या जिल्ह्यांमध्ये लागू राहणार आहे.

पान १ वरून...

## सुरांची ‘सम्राज्ञी’ आशा भोसले यांचं निधन; जावेद अख्तर, सायरा बानो, रझा मुराद यांच्यासह दिग्गजांनी वाहिली श्रद्धांजली

अविस्मरणीय आहे. त्यांच्या आवाजातील सहजता, खेळकरपणा आणि मखमलीपणाची बरोबरी कोणीही करू शकलं नाही. पंचम दा यांच्या निधनानंतर आशा भोसले पूर्णपणे खचल्या होत्या. परंतु, या दुःखातून त्यांनी स्वतःला सावरलं आणि आयुष्यात खूप काही करून दाखवलं. त्या शिस्तप्रिय होत्या. त्यांनी अनादर किंवा बेशिस्तपणा कधीही सहन केला नाही. आशा भोसले यांनी ९२ वर्षांच्या आयुष्यात असंख्य आठवणी आणि एक अमूल्य वारसा मागं ठेवला आहे. जोपर्यंत हे जग अस्तित्वात आहे, तोपर्यंत त्यांचा सुमधुर आवाज आपल्या कानांत घुमत राही,'' अशा भावनिक शब्दात ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद यांनी आशा भोसले यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना श्रद्धांजली वाहिली.

**आशा भोसले यांचा आवाज कधीही विसरला जाणार नाही :** ''आशा भोसले यांचं निधन ही एक मोठी हानी आहे. त्यांचा सुमधुर, शिस्तबद्ध आणि अद्वितीय आवाज कधीही विसरला जाणार नाही. मी लहानपणापासून त्यांची गाणी ऐकत आलो आहे आणि त्यांनी नेहमीच माझ्यावर कौतुक आणि प्रेमाचा वर्षाव केला आहे,'' असं सांगत ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी श्रद्धांजली आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली.

**आपण सर्वजण त्यांना स्मरणात ठेवू :** ''आशाताईंनी माझ्या जीवलगा या चित्रपटात गाणं गायलं होतं. मी त्यांची गाणी ऐकत बसायचो. त्या आता आपल्यात नाहीत, पण त्यांच्या आठवणी आणि त्यांचं संगीत आपल्यासोबत कायम राहील. आपण सर्वजण त्यांना स्मरणात ठेवू. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो,'' असं सांगत अभिनेते, निर्माते आणि दिग्दर्शक महेश कोठारे यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**आवाज कायम जिवंत राहिल :** ''आशा भोसले या देशासाठी एक अनमोल ठेवा होत्या. लताजी आणि आशाजी यांच्यासारख्या महान व्यक्ती दुर्मिळ असतात. ती शारीरिकरित्या आपल्यात नसली तरी, त्यांचा आत्मा आणि त्यांचा आवाज कायम जिवंत राहिल. त्यांचं संगीत, त्यांचा विनोद आणि त्यांची शिस्त येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील. त्या प्रत्येक परिस्थितीत खंबीर राहिल्या आणि त्यांनी आपल्या देशवासियांना आयुष्यभराचा अनमोल ठेवा दिला. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी आम्ही प्रार्थना करतो,'' अशी भावना व्यक्त करत पार्श्वगायक कैलाश खेर यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली.

**त्या शेवटपर्यंत सक्रिय राहिल्या :** ''आम्ही आशा भोसले यांची गाणी ऐकत मोठे झालो. मला त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली हे माझं भाग्य होतं. त्यांनी माझ्या सत्ता आणि कॉर्पोरेट या चित्रपटांमध्ये गाणी गायली. त्यांच्या जादुई आवाजानं अनेक दशकं संगीतप्रेमींची मनं जिंकली. आजही त्यांची गाणी सर्वत्र अगदी डिस्कोमध्येही ऐकू येतात, हीच त्यांची महानता आहे. त्या शेवटपर्यंत सक्रिय राहिल्या. त्यांची ऊर्जा अविश्वसनीय होती. आशा भोसले यांना माझी मनःपूर्वक श्रद्धांजली,'' असं म्हणत निर्माता, दिग्दर्शक मधुर भांडारकर यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली.

**... हे त्यांचं मोठं वैशिष्ट्य होतं :** ''आशा भोसले याच्यासोबतची भेट अनेकदा हलक्याफुलक्या गप्पांनी सुरू व्हायची. पण कधीकधी त्या गप्पा अधिक गंभीर वळण घ्यायच्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची दोन वैशिष्ट्ये होती. एक म्हणजे परिपूर्ण आत्मविश्वास आणि दुसरी नेहमी शिकण्याची तीव्र इच्छा. या दोन गुणांचं मिश्रण हेच त्यांचं सर्वात मोठं वैशिष्ट्य होतं. मला आठवतं, एकदा नुसरत फतेह अली खान साहेब भारतात आले होते. त्यावेळी एका अवघड चालीवर काम सुरू होतं. आशाजींनी ती अवघड चाल इतक्या गांभीर्यानं आणि एकाग्रतेनं गायली की सगळेच थक्क झाले. त्यांच्या आवाजानं ते आव्हान पेललं. त्या क्षणी त्यांच्या चेहऱ्यावर आम्हाला एकाग्रता आणि उत्कटता दिसली. हीच त्यांची प्रतिभा होती. त्यांचा आत्मविश्वास आणि शिकण्याची तहान होती म्हणूनच त्यांचे संगीत आणि त्यांच्या आठवणी कायम जिवंत राहतील,'' अशा आठवणींना उजाळा देत गीतकार जावेद अख्तर यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली.

**आशा भोसले यांचं निधन हा एक मोठा धक्का :** ''मला आशा भोसले यांनी गायलेल्या एका गाण्याची ओळ आठवते, आबका गम जो इस दिल में दिन-रात अगर होगा... मला त्यांच्या आवाजातील आध्यात्मिकता ऐकण्याची आणि अनुभवण्याची संधी मिळाली. त्यांचं निधन हा एक मोठा धक्का आहे. आम्ही सर्वजण त्यांना कायम स्मरणात ठेवू,'' अशा शब्दात पार्श्वगायक शब्बीर कुमार यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली.

**त्यांनी प्रत्येकाला आपल्या कलेनं समृद्ध केलं :** ''जवळपास ३० वर्षांपूर्वी, जेव्हा मी जरा सा झूम लूं मैं हे गाणं गायलं होतं. तेव्हा आशाजी गंमतीनं म्हणाल्या होत्या, ना रे ना रे ना आणि ती आठवण आजही ताजी आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, आशाजींनी संगीतकार, गीतकार आणि सहकारी गायक अशा सर्वांना नेहमीच काहीतरी दिलं. त्या खरोखरच एक साक्षात अवतार होत्या. ज्यांनी आपल्या कलेनं प्रत्येकाला समृद्ध केलं. प्रत्येक कलाकाराचं एक युग असतं, आणि आशाजींचं युग नेहमीच स्मरणात राहील. त्यांचं निधन ही एक मोठी हानी आहे,'' अशी भावना पार्श्वगायक अभिजीत भट्टाचार्य यांनी व्यक्त केली.

**त्या अत्यंत मायाळू आणि प्रेमळ व्यक्ती होत्या :** ''आशा भोसले यांचं निधन ही एक मोठी हानी आहे. त्या खऱ्या अर्थानं एक सुमधुर गायिका होत्या. चित्रपटसृष्टीच्या सुरुवातीपासूनच त्यांच्या गाण्यांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले होते. मलाही त्यांच्या गाण्यांमध्ये अभिनय करण्याचं भाग्य लाभलं होतं. सीता गीता, सत्ते पे सत्ता आणि खुशबू यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या गाण्यांनी माझ्या अभिनयाला अधिकच प्रभावी बनवलं. त्यांचा आवाज प्रत्येक प्रकारच्या भावनांना साजेसा होता. प्रेमळ, उत्साही आणि शास्त्रीय. वाढत्या वयातही त्या तरुण पात्रांसाठी गात राहिल्या. अशी बहुआयामी प्रतिभा इतर कोणत्याही गायकामध्ये नाही. त्या एक अत्यंत मायाळू आणि प्रेमळ व्यक्ती होत्या. त्यांनी मला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या. आम्ही सर्वजण त्यांना कायम स्मरणात ठेवू,'' अशा शब्दात ज्येष्ठ अभिनेत्री हेमा मालिनी यांनी आशा भोसले यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

**आपल्या आशाताई गेल्या :** ''२० ऑक्टोबर १९८८, विजयादशमी. ताडदेवच्या फिल्म सेंटरला पुरूषोत्तम बेर्डेच्या, हमाल दे धमाल चित्रपटाचा मुहूर्त !, आणि आयुष्यात मी लिहिलेल्या पहिल्या गाण्याचं रेकॉर्डिंग !, मनमोहना तू राजा स्वप्नातला.., संगीतकार अनिल मोहिले यांनी चार रागात बांधलेलं गाणं.. १५ व्हिदम सेक्शन, ३ सतार, शहनाई, मृदंगम्, तबला तरंग, १०-१२ व्हायोलिन्स... असे ४५ म्युझिशियन्स.. तबल्याला साक्षात भवानी दादा.. आशाताई भोसले आणि रवींद्र साठे गाणार... पण... पण त्या दिवशी आवाज ठीक नसल्यानं आशाताई गायला आल्याच नाहीत ! त्यांना गाण्याचा ट्रॅक घरी पाठवला..नंतर चार दिवसांनी त्या आल्या, तेव्हा गाणं गुणगुणतच आल्या.. आधी गाणं ऐकून, रिहर्सल करून गावं तशा, कमालीच्या सहजतेनं अप्रतिम गायल्या... त्यानंतरच्या काळात आशाताईंनी माझी आणखी चार गाणी गायली.. पण... पण आता आशाताई गायला, कधीही.. कुठेही.. येणार नाहीत.. कारण.. कारण आज आपल्या आशाताई गेल्या... त्यांना मन:पूर्वक आदरांजली !,'' अशी आठवण सांगत करत ज्येष्ठ लेखक विवेक आपटे यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली.

# लोणी गवळी येथे आमदारांची शाळेला धडक भेट; महिलांच्या तक्रारीनंतर मुख्याधिकाऱ्यांशी चर्चा

## पॉक्सो प्रकरणी कठोर कारवाईचे आश्वासन, दोन महिला शिक्षकांची तत्काळ नियुक्ती








दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी :** लोणी गवळी येथील जिल्हा परिषद शाळेत घडलेल्या गंभीर प्रकाराच्या पार्श्वभूमीवर आमदारांनी आज अचानक भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी विशेषतः महिला पालकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. घटनेबाबत संताप व्यक्त करत आमदारांनी संबंधित प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

या प्रकरणी पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल असून, पुरावे आणि साक्षींच्या आधारे आरोपीला निश्चित शिक्षा होईल, असे पोलिसांकडून आश्वासन मिळाल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेवर आपण सुरुवातीपासून लक्ष ठेवून असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शाळेतील शिक्षकांची कमतरता लक्षात घेता तातडीने दोन महिला शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची घोषणा आमदारांनी केली.

तसेच विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराबाबत पालकांनी व्यक्त केलेल्या नाराजीची दखल घेत, सध्याच्या खिचडी पुरवठादाराला बदलून नवीन पुरवठादार नेमण्याचे आदेश देण्यात आले. शाळेचा एकूण शैक्षणिक दर्जा चांगला असला, तरी अशा प्रकारच्या घटनांमुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे आमदारांनी नमूद केले.

''काही विकृत प्रवृत्तीमुळे शिक्षक वर्गाची प्रतिमा मलिन होत आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे,'' असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला. यासंदर्भात जिल्हा परिषद मुख्याधिकाऱ्यांशी थेट चर्चा करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

याशिवाय, शिक्षकांसाठी नियमित प्रबोधन वर्ग घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पालक-शिक्षक संवाद वाढवून विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी संयुक्त प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

''शाळा ही केवळ शिक्षणाची नव्हे, तर संस्कारांची पायाभरणी करणारी जागा आहे. त्यामुळे अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी प्रशासन, शिक्षक आणि पालकांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे,'' असे आवाहन करत आमदारांनी या प्रकरणाचा पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### वृत्तविशेष...

## डोणगाव येथे महात्मा ज्योतिराव फुले जयंती उत्साहात साजरी



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव । प्रतिनिधी :** (ता. मेहकर) : जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा, डोणगाव येथे दि. ११ एप्रिल २०२६ रोजी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात व मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा. बालप्रसाद केशवराव आखाडे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून भाजपा महिला आघाडी मेहकर तालुका अध्यक्षा मा. ज्योतीताई बुरखडे तसेच ज्ञानेश्वरीताई आखाडे उपस्थित होत्या. यावेळी प्रमोद रायमुलकर सर, जितेंद्र मैद, मुख्याध्यापिका सौ. वर्षा लाभांडे, सौ. काळे मॅडम, कु. जोगी, बोरुडे, जामकर, भुसारी मॅडम, परमाळे सर, गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. यानिमित्ताने शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बालप्रसाद आखाडे यांनी शाळेला १० सिलिंग फॅन सप्रेम भेट देत सामाजिक बांधिलकी जपली. तसेच सचिन गाभणे यांनी महात्मा फुले यांची प्रतिमा भेट दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राहुल अंगरदिवे सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकवृंदांनी परिश्रम घेतले. शेवटी मुख्याध्यापिका सौ. वर्षा लाभांडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## आलिशान बीएमडब्ल्यू ने कारला उडवलं, १८ वर्षीय चालकावर गुन्हा

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबईतील वांद्रे-वरळी सी लिंकवर शनिवारी पहाटे भीषण अपघाताची घटना घडली आहे. एका १८ वर्षीय तरुणाने चालवलेल्या भरधाव बीएमडब्ल्यू कारवरील नियंत्रण सुटल्याने तिने पुढच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात दोन्ही वाहनांचं मोठं नुकसान झालं आहे. बीएमडब्ल्यू कारचा पुढील आणि मागील भाग चक्काचूर झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी (११ एप्रिल) पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. महेंद्र अरविंद राजहंस (वय १८) हा तरुण आपली बीएमडब्ल्यू कार घेऊन सी लिंकवरून जात होता. मध्यरात्रीनंतर रस्ता मोकळा असल्याने कारचा वेग प्रचंड होता. मात्र, वेग मर्यादेपेक्षा जास्त असल्याने महेंद्रचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि त्याची कार थेट पुढे असणाऱ्या दुसऱ्या एका वाहनावर जाऊन आदळली.

ही धडक इतकी भीषण होती की, सी लिंकवर मोठा आवाज झाला. या अपघातात बीएमडब्ल्यू कारच्या दर्शनी भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे, तर दुसऱ्या वाहनाचेही मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. अपघातानंतर इतर वाहनधारकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली आणि वरळी पोलिसांना या घटनेची माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच वरळी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्त वाहने बाजूला केली आणि विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत केली. पोलिसांनी महेंद्र राजहंस याला ताब्यात घेतले असून त्याच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. वरळी पोलिसांनी या प्रकरणी महेंद्र राजहंस विरोधात भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५, ३२४(४) तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

## ओव्हरहेड वायरमध्ये तांत्रिक बिघाड! नायगाव-भाईदर दरम्यान लोकल सेवा विस्कळीत

दैनिक आपला विदर्भ

**वसई । प्रतिनिधी :** नायगाव आणि भाईदर दरम्यान असणाऱ्या खाडी पुलावरील ओव्हरहेड वायर तुटल्यामुळे रविवारी सकाळी लोकल सेवा विस्कळीत झाली होती. ओव्हरहेड वायरच्या दुरुस्तीसाठी विविध मार्गांवरील गाड्या अडवण्यात आल्या होत्या. विरार ते चर्चगेट दरम्यान दररोज हजारोंच्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या आणि कमी गर्दीच्या दिवशीही सकाळ व संध्याकाळच्या सुमारास या मार्गावर धावणाऱ्या लोकल गाड्यांमध्ये भरगच्च गर्दी असल्याचे दिसून येते.

## महसूल अधिकाऱ्यांसाठी नवीन नियमावली जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी :** महसूल विभागातील राजपत्रित अधिकारी वारंवार आणि दीर्घकाळ इतर विभाग किंवा महामंडळांमध्ये प्रतिनियुक्तीवर जात असल्याने मूळ कामकाजावर परिणाम होत असल्याचे लक्षात आले आहे. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने नवीन मार्गदर्शक नियमावली जारी केली असून, आता प्रतिनियुक्ती पूर्ण केल्यानंतर अधिकाऱ्यांना मूळ विभागात किमान ३ वर्षे सेवा देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

नवीन नियमांनुसार, कोणत्याही अधिकाऱ्याने प्रतिनियुक्तीचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर त्याला पुन्हा प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी मूळ विभागात किमान तीन वर्षे काम करावे लागणार आहे. या कालावधीशिवाय पुढील प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही.

नियमावलीनुसार, अधिकाऱ्यांना सुरुवातीला जास्तीत जास्त ३ वर्षांसाठीच प्रतिनियुक्तीवर जाता येईल. यामुळे दीर्घकाळ बाहेर राहण्याची प्रवृत्ती रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

कोणत्या अधिकाऱ्यांना लागू?

हे नवीन नियम अतिरिक्त जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच भूमी अभिलेख विभागातील सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांना लागू असतील. त्यामुळे या निर्णयाचा म ोठ्या प्रमाणावर प्रशासकीय यंत्रणेवर परिणाम होणार आहे.

मंत्र्यांच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यांसाठी वेगळे नियम

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा मंत्र्यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांसाठी प्रतिनियुक्तीचा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षे निश्चित करण्यात आला आहे. त्यापेक्षा जास्त काळासाठी प्रतिनियुक्ती हवी असल्यास मुख्यमंत्र्यांची विशेष मान्यता घेणे आवश्यक राहील. विशेष परिस्थितीत प्रतिनियुक्तीच्या कालावधीत केवळ १ वर्षाची मुदतवाढ दिली जाऊ शकते.

## 'समृद्धी'वर 'बर्निंग ट्रक'चा थरार! चालक बचावला पण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** लोकार्पणापासून लहान मोठ्या अपघातानी हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग गाजत आहे. नियमित अंतराने होणारे अपघात, त्यात जाणारे बळी, होणारे नुकसान चिंता अन चिंतनाचा विषय ठरत आहे. या पार्श्वभूम ीवर रविवारी पुन्हा बुलढाणा जिल्ह्यातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर पुन्हा एकदा अपघात झाला. मात्र सुदैवाने किंवा मालवाहू वाहनाच्या चालकाने दाखविलेल्या प्रसंगावधाने प्राणहानी टळली

अचानक घेतला पेट इंव्हर्टरच्या बॅटरी घेऊन जाणाऱ्या ट्रकमधील बॅटरीने अचानक पेट घेतला.

धूर निघत असल्याचे लक्षात येताच चालकाने ट्रक कडेला उभा केल्याने मोठी दुर्घटना टळली. मात्र ट्रक व त्याम धील बॅटरी पूर्णतः जळून खाक झाल्या. मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गावर आज रविवारी १२ एप्रिल रोजी सकाळी दुसरबीड ( तालुका सिंदखेड राजा ) जवळ ही घटना घडली. गाजीपूर येथील चालक रोहित कुमार हा बनारस येथून( यूपी ६५ आर डी २१४० क्रमांकाच्या) ट्रकमध्ये इन्व्हर्टर बॅटरी घेऊन, समृद्धी महामार्गाने नाशिक कडे निघाला होता.

दुसरबीडजवळ चॅनेल क्रमांक ३१२ वर मागे ठेवलेल्या बॅटरीमधून धूर येत असल्याचे चालकाच्या लक्षात आले. त्याने तातडीने ट्रक रस्त्याच्या एका कडेला उभा केला. तोपर्यंत बॅटरींनी मोठी आग पकडली होती.




**फायर ब्रिगेडच्या तीन वाहनांनी आग विझवल**

घटनेची माहिती समजताच समृद्धी महामार्ग पोलीसचे सहाय्यक पोलीस निरीक्षक इंगळे, शेख नासिर, नाजीम चौधरी, श्रीकृष्ण दूंगू, गायकवाड, इंदल राजपूत हे घटनास्थळी पोहोचले. समृद्धी महामार्गावरील दोन लहान अग्निशामक वाहन, तसेच मेहकर नगरपालिकेचे एक अग्निशमन दल तातडीने पोहोचले. मात्र तोपर्यंत वाहनातील सर्व बॅटरी जळून खाक झाल्या. तसेच ट्रकही मोठ्या प्रमाणात जळाला. तिन्ही वाहनांनी आगीवर नियंत्रण मिळवले. या घटनेत मोठी आर्थिक हानी झाली आहे. मात्र चालकाने प्रसंगावधान राखल्याने त्याचा जीव वाचला.

## साडेचार तासांचा प्रवास अडीच तासात, अहिल्यानगर ते बीड सुसाट, गेमचेंजर प्रकल्पाची डेडलाईन ठरली!

दैनिक आपला विदर्भ

**बीड । प्रतिनिधी :** मराठवाड्यातील जनतेचं गेल्या अनेक वर्षांचं स्वप्न लवकरच साकार होणार आहे. या भागातील रेल्वेने जाळे अधिक मजबूत होत असून अहिल्यानगर-बीड-परळी या २६१ किमीच्या ब्रॉडगेज मार्गाची उभारणी करण्यात येत आहे. आता या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून मे २०२६ अखेर हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे प्रवास जलद आणि सुखकर होणार असून वेळही वाचेल.

नुकतेच बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड ते परळी मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केली. वडवणीपर्यंत मोपेड ट्रॉलीने प्रवास करत घोडका जुरी, बावी, उपळी, लोळद, चटागाव, फकीरजवळा, देवदहिफळ, खामगाव, तपोवन, आदी गावांतील रेल्वेच्या कामांची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत उपमुख्य अभियंता, माजलगाव व परळीचे उपविभागीय अधिकारी आणि इतर अधिकारी होते.

अहिल्यानगर ते बीड या १६७ किम ीच्या मार्गावर सध्या डेमू रेल्वे सुरू आहे. सिग्नल इंटरलॉकिंगचे काम पूर्ण झाल्यानंतर या गाडीचा वेग वाढणार आहे. विशेष म्हणजे त्यामुळे साडेचार तासांचा प्रवास अवघ्या अडीच तासात होईल. हा मार्ग पुणे रेल्वे मार्गाशी जोडण्यासाठी पुण्यातील हडपसर येथे प्लॅटफफॉर्म उपलब्ध करून देण्याचे नियोजन देखील सुरू आहे.

दरम्यान, केंद्र आणि राज्य सरकारच्या ५०-५० टक्के भागीदारीतून हा प्रकल्प होत आहे. यामध्ये बीड ते वडवणी दरम्यान भू-संपादन आणि रेल्वे विभागाची महत्त्वाची कामे पूर्ण झाली आहेत. तर काही ठिकाणी उन्नत पुलांची कामे सुरू आहेत. त्यात विविध अडथळे दूर झाल्याने भू-संपादन प्रक्रिया देखील अंतिम टप्प्यात आहे.

अहिल्यानगर-बीड-परळी मार्ग मे २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर स्थानिक व्यापार आणि पर्यटनाला चालना मिळेल. तसेच प्रवासाचा वेळ आणि पैसा देखील वाचणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज व महाराणी गुणवंताबाईंच्या विवाह स्मृतींना ३७० वर्षे पूर्ण

## १५ एप्रिल रोजी ऐतिहासिक करवंड महोत्सव २०२६ चे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि चिखली तालुक्यातील करवंड येथील महाराणी गुणवंताबाई इंगळे यांच्या ऐतिहासिक विवाहाच्या स्मृतींना ३७० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक घटनेचे औचित्य साधून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि करवंड महोत्सव कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, १५ एप्रिल २०२६ रोजी करवंड येथे ऐतिहासिक करवंड महोत्सव २०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाच्या माध्यमातून शिवकालीन इतिहास आणि संस्कृतीचे दर्शन नागरिकांना घडणार असून, आ. सौ. श्वेताताई महाले पाटील व करवंड महोत्सव कृती समितीने या सोहळ्यासाठी जय्यत तयारी केली आहे.

**महोत्सवाचे प्रमुख आकर्षण आणि कार्यक्रम रूपरेषा**

महोत्सवाची सुरुवात सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अभिषेकाने होईल. त्यानंतर सकाळी ८ ते १० या वेळेत भव्य ऐतिहासिक शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत लेझीम पथक, बँड, अश्वदल, पालखी आणि ऐतिहासिक वेशभूषेतील मावळ्यांचा सहभाग असेल. विशेष म्हणजे, शिवकालीन युद्धकला जसे की लाठी, तलवारबाजी, दांडपट्टा आणि आगीच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांचे सादरीकरण यावेळी केले जाईल.

दुपारच्या सत्रात शाहिरी आणि व्याख्यानांचा भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये शिवशाहीर प्रवीणजी फणसे (मुंबई) यांचा दुपारी १२ ते १.३० या वेळेत पोवाड्यांचा कार्यक्रम सादर करतील. प्रा. यशवंत गोसावी दुपारी १.३० वाजता ऐतिहासिक व्याख्यान देतील. शाहीर विक्रांत राजपूत (बुलढाणा) दुपारी ३.३० वाजता लोककला सादरीकरण करतील. रामचंद्र पाटील (पुणे) सायंकाळी ४.३० वाजता युगपुरुष शिवराय या विषयावर विचार मांडतील. डॉ. नम्रता भोसले-मोहिते: सायंकाळी ५.३० वाजता मराठकालीन स्त्री सामर्थ्य या विषयावर व्याख्यान देतील.

महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे रात्री ७ ते १० या वेळेत होणारा मराठी पाऊल पडते पुढे हा सांस्कृतिक कार्यक्रम. उदय साटम (मुंबई) यांच्या दिग्दर्शनाखाली ४५ कलाकार भव्य स्टेजवर शिवरायांच्या जीवनातील विविध प्रसंग, युद्धे, गोंधळ, जोगवा आणि कोळीगीतांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या महान संस्कृतीचा अविष्कार सादर करतील. कार्यक्रमाची सांगता रात्री १० वाजता बावण बुरुजावरून होणाऱ्या नयनरम्य बारूद आतिषबाजीने होईल.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे प्राचीन शस्त्रे व नाणी प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन आणि महिला बचत गटांचे स्टॉल्स हे असणार आहेत. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी शिवरायांच्या सर्व महाराणींच्या घराण्यातील वंशज विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहणार आहेत. चिखली मतदारसंघाच्या आमदार श्वेताताई विद्याधर महाले पाटील आणि महोत्सव समितीने बुलढाणा जिल्ह्यातील तसेच परिसरातील शिवप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने या ऐतिहासिक महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.